www.yuvashaktiexpress.in

मराठी साप्ताहिक

# युवाशक्ती एक्सप्रेस

RNI No. MAHMAR/2016/72543



सौ. रुबिना मुल्ला
कार्यकारी संपादिका
मो-९८९०८७९७५७

वर्ष ७ वे | अंक : ०८ | रविवार २५ मे ते ३१ मे २०२५ | किंमत रू. १/- | पृष्ठ : ४

पान २ — संपादकीय — 'ईडी'चे सूडचक्र

पान ३ — सीयूसी विभागाचे प्रमुख उपायुक्त दीपक सावंत...

पान ४ — ईडीकडून मोठ्या मगरमच्छांवर हल्ला;...

# 'कचऱ्याच्या नावावर कोट्यवधींचा घोटाळा - वसई-विरारमध्ये 'भ्रष्टाचाराचा डंपिंग ग्राउंड' उघड'

## सूत्राच्या माहितीनुसार घनकचरा ठेकेदार यांच्याकडून पत्रकार रुबिना मुल्ला हिच्या जीवाला धोका ?



## मजुरांच्या नावावर बोगस नेमणुका, RTI ला केराची टोपली, आणि सार्वजनिक निधीचा पद्धतशीर अपहार?

## घनकचरा व्यवस्थापनात 'कॉर्पोरेट लूट' - कायदा झोपला की गोंधळ सोडून दिला?

# प्रकरण: कामगार हक्कांवर गदा -महापालिकेच्या ठेकेदारांमार्फत कोट्यवधींचा फसवणुकीचा प्रकार उघड

प्राथमिक तथ्य व माहिती-वसई-विरार महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात दिले जाणारे मजुरांचे ठेके हे केवळ कायद्यानुसार मजूर पुरविण्याच्या उद्देशाने मंजूर आहेत. तथापि, कामगार कायदे, कंत्राटी कामगार अधिनियम, व माहिती अधिकार कायद्याचे स्पष्ट उल्लंघन करून, या ठेक्यांद्वारे ठेकेदारांनी स्वतच्या घरातील व्यक्ती, कार्यालयीन कर्मचारी, व नातेवाईक यांची बेकायदेशीर नेमणूक मुकादम व वाहनचालक म्हणून केली आहे.

कायद्याचे गंभीर उल्लंघन- १.कंत्राटी कामगार कायदा, १९७० (Contract Labour [Regulation & Abolition] Act, १९७० ):कलम ७ व १२ नुसार, केवळ मंजूर झालेल्या कामांसाठीच कंत्राटी कामगारांची नेमणूक करता येते. मुकादम व वाहनचालक यांची नियुक्ती ठेक्याच्या मूळ स्वरूपात नसताना देखील त्यांच्या नावावर बिले काढली जात आहेत, हे ठेक्याच्या अटींचे सरळ उल्लंघन आहे.

२.किमान वेतन अधिनियम, १९४८ (Minimum Wages Act, 1948):
या कायद्यानुसार, कामाचे स्वरूप प्रमाणित करून त्यानुसार कुशल व अकुशल कामगारांना वेगवेगळे वेतन देणे बंधनकारक आहे. तथापि, कुशल काम करणाऱ्यांना अकुशल दराने पगार दिले जात आहेत, ज्यामुळे हा गंभीर आर्थिक अन्याय ठरत आहे.

३. भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (Prevention of Corruption Act, 1988):
ठेकेदारांचे बिले मंजूर करताना माहिती लपवणे, बोगस कर्मचाऱ्यांना पगार देणे व अधिकाऱ्यांना लाभ देणे हे सर्व कलम ७,८,व १३ अंतर्गत भ्रष्टाचार मानले जाते.

४.भारतीय दंड संहिता (IPC):
४२० - फसवणूक करून संपत्ती मिळवणे
४६८ - बनावट दस्तऐवज तयार करणे
४७१ - बनावट कागदपत्रांचा वापर

या सर्व गुन्ह्यांचे पुरावे महापालिकेच्या आर्थिक अभिलेखांत स्पष्टपणे आढळतात.

५.माहिती अधिकार कायदा, २००५ (RTI Act, २००५ ):कलम ७ नुसार, ३० दिवसांत माहिती द्यावी लागते. तथापि, ६ महिन्यांहून अधिक वेळ झाला तरी माहिती न देणे, व अपील झुलवत ठेवणे, हे कलम २० अंतर्गत दंडात्मक आहे.

भ्रष्टाचाराच्या पंगतीला अधिकारीही बसलेत!

या सगळ्या गोंधळाविरुद्ध सामाजिक कार्यकर्त्या रुबिना मुल्ला यांनी अनेकदा लेखी तक्रारी केल्या, माहिती अधिकारात अर्ज दिले... पण काय उपयोग?

उपायुक्त नानासाहेब कामठे, माजी जनमाहिती अधिकारी सुकदेव दरवेशी, सद्य अधिकारी निता कोरे, आणि अपीलीय अधिकारीही याच भ्रष्टाचाराचं चक्र फिरवताना दिसतात!

६ महिन्यांनंतरही माहिती नाही, पहिल्या अपिलालाही प्रतिसाद नाही, दुसऱ्या अपिलालाही झुलवत ठेवलं जातंय!प्रशासकीय असंवेदनशीलतेचा कळस - नोटीस काढली पण सापडत नाही! - हा काय बालिशपणा आहे का? उपायुक्त नानासाहेब कामठे यांचं म्हणणं असं आहे की, सुखदेव दरवेशी यांच्यावर माहिती न दिल्याबद्दल नोटीस काढण्यात आली आहे. पण त्यांच्या सहाय्यक अधिकारी श्री. दीपक जाधव यांचं स्पष्ट म्हणणं आहे की,

'नोटीस सापडत नाही.'- काय कमाल आहे - जर नोटीस काढलीच नसेल, तर ती सापडणार तरी कुठून?

ही सगळी 'नोटीस-नोटीस'ची नौटंकी म्हणजेच सामान्य जनतेला फसवण्याचा थेट प्रकार आहे!

यावरून हे स्पष्ट होते की, 'नोटीस काढल्याचा केवळ देखावा' केला जातो आहे. प्रत्यक्षात, ही प्रशासकीय पातळीवरची दिशाभूल व सबळ पुरावे लपवण्याचा प्रयत्न आहे.'कारवाई नाही, पण 'सेटिंग' चालूच!

तक्रार केली की अपेक्षित कारवाई न होता, कामठे साहेब स्वत ठेकेदारांना आपल्या केबिनमध्ये बसवून 'बैठक' घेतात हे काय कारवाई आहे की भ्रष्टांची केबिन मिटिंग?

बोगस बिलांची बारावी - ठेकेदार म्हणतात, सगळ्यांना पैसे देतो, कोण काय करणार?

एका ठेकेदाराने दिलेलं विधान अंगावर शहारे आणणारं आहे: 'प्रत्येक बिलामागे आम्ही सगळ्या अधिकाऱ्यांना पैसे देतो. त्यामुळे आमच्यावर कोणी कारवाई करू शकत नाही. Z फंड सगळ्यांना मिळतो!'हे विधान म्हणजे एका भ्रष्ट यंत्रणेचा जाहीरनामा आहे.

बोगस कर्मचाऱ्यांचे स्वरूप:-बायोमेट्रिक हजेरी बंद

पान नं२

# 'अनधिकृत इमारतींचा स्फोट! - सात मजल्यांची 'Anwar Mansion', 'Reliable' आणि 'Chinmay Apartment' घोटाळ्यांचा महाभयंकर पर्दाफाश'

वसई - विशेष प्रतिनिधी

वसई-विरार महानगरपालिकेच्या नगररचना विभागाच्या ढिसाळतेचा आणि भ्रष्टाचाराच्या दलदलीचा निर्घृण नमुना म्हणजेच चौबारे गावातील 'Anwar Mansion' ही सात मजली अनधिकृत इमारत.फक्त पाच मजल्यांची परवानगी घेऊन उभारलेली ही इमारत म्हणजे कायद्याला थेट लाथ मारणारा, प्रशासनाच्या संगनमताने उभारलेला बेकायदेशीर महाकाय डोंगर आहे!Anwar Mansion' - कायद्याच्या पायाखालचा चिरडलेला न्याय!CTS नं. 2879, 2881 आणि 2882 या भूखंडांवर उभी राहिलेली 'Anwar Mansion' ही इमारत केवळ बांधकामाचे उल्लंघन नाही, तर हजारो सामान्य जनतेच्या विश्वासावर घातलेला दरोडाच आहे. संबंधित बांधकाम व्यावसायिकाने बेकायदेशीररित्या सात मजले उभे करून, बाहेरून पत्र्याचे शेड्स, बेकायदेशीर पार्किंग व्यवस्था तयार केली. सर्वात भयंकर म्हणजे - या इमारतीतील फ्लॅट्स बनावट कागदपत्रांवर विकले गेले! सामान्य जनतेला स्वप्न दाखवून, लाखो रुपयांची लूट करण्यात आलीज्रेव्हा यावर प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा संबंधिताने गर्वाने उत्तर दिलं: 'हो, मीच सात मजली इमारत बांधलीय! आहे का माय का लाल जो तोडून दाखवेल?''Reliable' – O.C. शिवाय विक्री,



आणि आजतागायत टँकरवर जगणारी जनता!

२०१३ मध्ये पापडी येथे उभारण्यात आलेल्या Reliable नावाच्या इमारतीत एकाही फ्लॅटसाठी O.C. घेण्यात आलेली नाही. तरीदेखील संबंधित व्यक्तीने सर्व फ्लॅट्स विकले आणि नागरिकांची सरळसरळ फसवणूक केली. आजही तेथे राहणारे नागरिक टँकरच्या पाण्यावर आपले आयुष्य कंठत आहेत! कायदा, सुविधा, अधिकार - सगळं काही केवळ कागदावर.प्रत्यक्षात तेथे अंधार, अपमान आणि लाचारपणा आहे.

'Chinmay Apartment' - फसवणुकीनंतर पुन्हा C.C.! Reliable इमारतीत फसवणूक केल्यानंतरही, त्याच व्यक्तीस पापडीतील Chinmay Apartment या इमारतीसाठी पुन्हा C.C. मंजूर करण्यात आलीक्रोणतीही कारवाई न करता, पुन्हा नव्या इमारतीचापरवाना कसा काय मिळतो? हे प्रशासनातील भ्रष्टाचाराच्या दुर्गंधीचं आणखी एक ठळक उदाहरण आहे.नगररचना अधिकारी Y.S. रेड्डी - भ्रष्टाचाराचा किल्लेदार!या सर्व घोटाळ्यांमागे एकच नाव पुन्हा पुन्हा समोर येतं - नगररचना अधिकारी श्री.Y.S. रेड्डी.समाजसेवक नय्यर मिसाळ यांनी थेट आरोप केला की -'O.C. नसलेल्या इमारतींसाठी C.C. मंजूर करणं, MRTP कायद्याची उघडपणे पायमल्ली करणं - हे सर्व रेड्डी यांच्या संगनमताने घडलंय हेच नव्हे, तर हैदराबादमधील रेड्डी यांच्या घरी ईडीच्या छाप्यात तब्बल ३२ कोटींची रोकड आणि मौल्यवान दागिने मिळाले.हे त्याच्या अधिकृत पगारातून अशक्य आह


पान नं२

# संपादकीय...!

## 'ईडी'चे सूडचक्र

तमिळनाडूतील मद्य परवाना गैरव्यवहार प्रकरणात द्धईडीष्ने राज्य पणन महामंडळावरच केलेल्या कारवाईबाबत न्या.गवई आणि न्या.ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.द्धईडीष्ठ सर्व सीमा ओलांडत असून, संघराज्य संकल्पनेचेही उल्लंघन करीत आहे,ठ अशा शब्दांत कानउघाडणी करून खंडपीठाने द्धईडीष्च्या कारवाईला स्थगिती दिलीसर्वोच्च न्यायालयांसह विविध उच्च न्यायालयांनी समज दिल्यानंतरही सक्तवसुली संचालनालयाचा ( ईडी ) अगोचरपणा थांबण्यास तयार नाही, हेच सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या खंडपीठाने द्धईडीष्वर ओढलेल्या ताशेऱ्यांमधून दिसून येत आहे.तमिळनाडूतील मद्य परवाना गैरव्यवहार प्रकरणात द्धईडीष्ने राज्य पणन महामंडळावरच केलेल्या कारवाईबाबत न्या.गवई आणि न्या.ऑगस्टिन जॉर्ज मसिह यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.द्धईडीष्ठ सर्व सीमा ओलांडत असून, संघराज्य संकल्पनेचेही उल्लंघन करीत आहे,ठ अशा शब्दांत कानउघाडणी करून खंडपीठाने द्धईडीष्च्या कारवाईला स्थगिती दिली.एखाद्या प्रकरणात कारवाई करत असलेल्या यंत्रणेलाच लक्ष्य करण्याच्या प्रयत्नांना यामुळे शह बसला आहे.

गेली दहा वर्षे हे प्रकरण तमिळनाडूमध्ये गाजत आहे.तेथील राज्य पणन महामंडळामार्फत राज्यातील मद्याच्या घाऊक व किरकोळ विक्री व्यवहारांचे नियंत्रण केले जाते.या संदर्भातील विविध व्यवहार आणि निविदा प्रक्रियेत सुमारे एक हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. त्यामध्ये मद्य परवान्यांसाठी बनावट कागदपत्रे सादर करणे, वाहतूक टेंडरमध्ये कागदपत्रांची फेरफार करून ठरावीक व्यक्तींनाच फायदा मिळवून देणे, खरेदीच्या बनावट नोंदी आणि बनावट ( शेल ) कंपन्यांची स्थापना, यांबरोबरच मोठ्या प्रमाणात लाचखोरी झाली असून, त्यात राजकारणी व नोकरशहांचाही समावेश असल्याचे आरोप करण्यात येतात.हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्य सरकारने महामंडळामार्फत फौजदारी कारवाई सुरू केली आणि सुमारे ४१ गुन्हे दाखल करण्यात आले होते.ही कारवाई सुरू असतानाच द्धईडीठ ने या प्रकरणात हस्तक्षेप करून दोन महिन्यांपूर्वी तमिळनाडूत महामंडळाच्या मुख्यालयासह विविध अधिकारी आणि मद्य व्यावसायिकांवर छापे घातलेराज्य सरकारकडून कारवाई सुरू असताना केंद्राच्या अखत्यारीतील द्धईडीष्ने शिरकाव करून कारवाई करणाऱ्या महामंडळावरच द्धमनी लाँडरिंगठ कायद्यानुसार कारवाईचा बडगा उगारण्यास राज्य सरकार आणि महामंडळाने आक्षेप घेतला होता.आता सर्वोच्च न्यायालयाने कडक ताशेरे ओढून या कारवाईला स्थगिती दिल्याने द्धईडीठ पुन्हा आरोपांच्या भोवऱ्यात अडकली आहे.पुढील वर्षीच्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणावरून तेथे राजकारण पेटल्यास नवल नाही. भारतीय जनता पक्षाचे तेथील प्रमुख नेते के. अण्णामलाई यांनी तेथील उत्पादन शुल्कमंत्री व्ही. सेंतिल बालाजी हेच या गैरव्यवहाराचे सूत्रधार असल्याचा आरोप केला असून, राज्य सरकारने पुरावे नष्ट करू नयेत, म्हणून द्धईडीष्ची कारवाई व्हावी, अशी मागणी केली होती. आता या प्रकरणी राज्य सरकारला बदनाम करण्याचा भाजपचा प्रयत्न फसल्याचा आरोप सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघमने केला आहेकाही दिवसांपूर्वीच तमिळनाडूत विधेयके अडवणाऱ्या राज्यपालांनाही सर्वोच्च न्यायालयाने फटकारले होते.बिगर भाजपशासित राज्ये आणि केंद्र सरकारच्या संबंधांमध्ये गेल्या काही वर्षांत कमालीचा कडवटपणा निर्माण झाला आहे. त्याबरोबरच विरोधी पक्षांच्या नेत्यांवरच द्धईडीष्कडून द्धपीएमएलएष्च्या गैरवापर करण्यात येत असल्याचा आरोप पूर्वीपासून आहे.संसदेत दिलेल्या माहितीनुसार, सन २०१९ ते २४ या काळात द्धमनी लाँडरिंगष्च्या ९११ तक्रारी करण्यात आल्या.त्यापैकी ६५४ खटल्यांचा निकाल लागला असून फक्त ४२, म्हणजे फक्त ६४२ टक्के प्रकरणांमध्ये दोषसिद्धी झाली आहे. दोषसिद्धीच्या या अत्यल्प प्रमाणामुळे या कारवायांमागे विरोधकांची बदनामी आणि राजकीय द्धब्लॅकमेलिंगष्च्या आरोपांना बळ मिळतेगुन्हेगारांना शिक्षा झालीच पाहिजे; मात्र वर्षानुवर्षे हे गुन्हे सिद्ध होत नाहीत आणि गुन्हे दाखल असलेली मंडळी मंत्रीपदे मिळवून सत्ताधाऱ्यांच्या मांडीला मांडी लावून बसतात, यातून जनतेने काय अर्थ काढावा? अन्य एका माहितीनुसार, १९३ राजकीय नेत्यांवर कारवाई करण्यात आली आणि त्यापैकी केवळ दोन प्रकरणांत दोषसिद्धी झाली आहे.द्धपीएमएलएठ कायद्यातील कठोर तरतुदी लागू करण्यासाठी पुढाकार घेणारे पी. चिदंबरम, राहुल गांधी, सोनिया गांधी, अरविंद केजरीवाल अशा अनेकांवर त्याच कायद्यानुसार कारवाई झाली, मात्र कोणावरही अद्याप आरोप सिद्ध न झाल्याने द्धप्रक्रिया हीच शिक्षाठ असे म्हणावे लागते. इतका कडक कायदा असूनही दोषसिद्धी का होत नसावी? विरोधकांच्या मागे द्धईडीष्चा तगादा लावण्यामागील सूडचक्राचे राजकारण यातून ठळकपणे समोर येते.




## 'कचऱ्याच्या नावावर कोट्यवधींचा घोटाळा.... पान नं १

ठेवण्यात आली आहे कारण –

मृत व्यक्तींच्या नावाने पगार घरगुती लोकांची हजेरी

प्रत्यक्ष हजेरी नसताना हजेरी दाखवणे हे सर्व 'Ghost Employees Fraud' प्रकारात मोडते.ठेकेदारांची यादी– हेच आहेत 'घन घोटाळ्याचे' शिल्पकार! ठेकेदार झोन साई गणेश इंटरप्रायझेस ३, १०, १६.२ ) हेना इंटरप्रायझेस ८, ११. ३ )अनंत इंटरप्रायझेस १, ५, ९. ४ ) उजाला लेबर कॉन्ट्रॅक्टर २, १२, १३. ५ ) रेनबो इंटरप्रायझेस ४.६ ) दिनेश संखे ६, २०. ७ ) मंदीप इंटरप्रायझेस १८. ८ )आर.बी.इन्फ्रा १९. ९ )रिलायबल एजन्सी ७, १४, १७. १० ) शिवम इंटरप्रायझेस १५

सार्वजनिक मागण्या व कायदेशीर कारवाईची आवश्यकता जनता, कामगार संघटना, आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने: सर्व ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध FIR नोंदवावी २ )बायोमेट्रिक हजेरी तातडीने लागू करावी ३ ) सर्व RTI प्रकरणांची स्वतंत्र न्यायिक चौकशी व्हावी ४ )सार्वजनिक निधीचा अपहार करणाऱ्यांविरुद्ध Economic Offences Wing मार्फत तपास व्हावा मजुरांच्या हक्कासाठी कामगार न्यायालयात याचिका दाखल व्हावी.

## अनधिकृत इमारतींचा स्फोट! -... पान नं.१

नालासोपाऱ्यात ४१ इमारतींना अनधिकृत , कोर्टाने केली जमीनदोस्त! नालासोपाऱ्यात अशाच प्रकारे ४१ अनधिकृत इमारतींना न्यायालयाच्या आदेशावर त्या सर्व इमारतींना जमीनदोस्त करण्यात आलं, आणि हजारो नागरिक बेघर झाले.पण या सगळ्यात प्रशासनाने फक्त पैसे कमावले – आणि सामान्य जनतेला उपासमारीसाठी रस्त्यावर सोडले.न्याय मागितला, धमक्या मिळाल्या!या भ्रष्टाचाराविरोधात तक्रार करणाऱ्या समाजसेवक नय्यर मिसाळ यांना संबंधित व्यक्ती व त्यांच्या साथीदारांकडून जिवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत.त्यांनी या संदर्भात मा.पोलीस उपायुक्त , मा.पोलीस निरीक्षक मिरा–भाईंदर वसई–विरार पोलीस आयुक्तालयात अधिकृत तक्रार दाखल केली आहे शेवटचा सवाल – शासन झोपलंय की भ्रष्टांचं सहकारी?आजही यामध्ये एकाही जबाबदार अधिकाऱ्यावर व विकासकावर MRTP कायद्याअंतर्गत कारवाई झाली नाही, कोणताही FIR दाखल झालेला नाही, कोणतंही तुरुंगवास झालेला नाही! हे सरकार खरंच जनतेचं आहे का भ्रष्टाचार्यांचं? सध्या तरी अनधिकृत इमारतींचं साम्राज्य सुरू आहे – आणि जर शासनाने आता कठोर पावले उचलली नाहीत, तर जनतेचा उद्रेक अटळ आहे!

## माहिती अधिकाराची खुली थट्टा! - आता सेकंड अपीलची तयारी; कोकण आयुक्तांनी प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी- कोकण आयुक्तांनी आता तरी सत्याला साथ द्यावी-सामाजिक कार्यकर्ता/पत्रकार रूबिना मुल्ला यांचा इशारा

वसई ( प्रतिनिधी ):वसई तालुक्यातील २३ ग्रामपंचायतींनी माहिती अधिकाराच्या कायद्याला खुंटीला टांगलं आहे, आणि संबंधित माहिती व अपील अधिकारी यांचं वर्तन पाहता, ते देखील या भ्रष्ट साखळीचे भाग आहेत, असा तिखट आरोप करत सामाजिक कार्यकर्ता/पत्रकार रूबिना मुल्ला यांनी दुसऱ्या अपीलची तयारी दर्शवली आहे. जर माहिती अद्यापही दिली गेली नाही, तर मी थेट सेकंड अपील दाखल करणार असून, या प्रकरणात कोकण विभागीय आयुक्तांनी लक्ष घालावं आणि योग्य न्याय द्यावा, असा विश्वास व्यक्त करताच त्यांनी एकाच वेळी यंत्रणेवर घणाघात केला आहे. झोपलेल्या अधिकाऱ्यांना झणझणीत इशारा!

संबंधित माहिती अधिकारी आणि प्रथम अपील अधिकारी हे कायद्यापेक्षा मोठे झाले आहेत की काय? त्यांनी नागरिकांच्या हक्कांची खुली पायमल्ली केली आहे. आता दुसऱ्या अपील अधिकाऱ्यांनी – म्हणजेच कोकण आयुक्तांनी – तरी निष्पक्षता दाखवून हे प्रकरण गंभीरपणे घेतलं नाही, तर लोकशाही व्यवस्था ही केवळ नावापुरती उरली आहे, हेच सिद्ध होईल!

दुसरा अपील म्हणजे शेवटचा इशारा!रुबिना मुल्ला यांचा हा इशारा केवळ वैयक्तिक नाही, तर तो संपूर्ण व्यवस्थेला सवाल करणारा आहे.जर दुसऱ्या अपीलमधून देखील अन्याय झाला, तर रस्त्यावर उतरून लढण्याशिवाय पर्याय उरणार नाही, असं त्यांनी ठणकावून सांगितलं.

मागणी काय?

- माहिती अधिकार कायद्याच्या कलमानुसार लवकरात लवकर माहिती द्यावी
- दोषी माहिती अधिकारी व अपील अधिकाऱ्यांवर IPC कलम १६६, १६७, १८८, २१७ व २१८ अंतर्गत फौजदारी कारवाई करावी
- कोकण विभागीय आयुक्तांनी प्रकरणात तत्काळ लक्ष घालावे.

माहिती न दिलेल्या ग्रामपंचायतींची यादी:

१ ) अर्नाळा ग्रामपंचायत
२ ) भाताणे ग्रामपंचायत
३ ) चंद्रपाडा ग्रामपंचायत
४ ) कळंब ग्रामपंचायत
५ ) करंजन ग्रामपंचायत
६ ) खानीवडे ग्रामपंचायत
७ ) खोंचिवडे ग्रामपंचायत
८ ) माजीवली ग्रामपंचायत
९ ) माळजीपाडा ग्रामपंचायत
१० ) मेंढे ग्रामपंचायत
११ ) पानजू ग्रामपंचायत
१२ ) पारोळ ग्रामपंचायत
१३ ) पोमन ग्रामपंचायत
१४ ) रांगाव ग्रामपंचायत
१५ ) सटपाळा ग्रामपंचायत
१६ ) सायवन ग्रामपंचायत
१७ ) शिवणसई ग्रामपंचायत
१८ ) तरखड ग्रामपंचायत
१९ ) टेंभी ग्रामपंचायत
२० ) तिल्हेर ग्रामपंचायत
२१ ) तिवरी ग्रामपंचायत
२२ ) तोक्रे ग्रामपंचायत
२३ ) वासलई ग्रामपंचायत

हक्क मागितल्यावर अधिकारी जर गुन्हेगारासारखं वागत असतील, तर ही लोकशाही नव्हे – ही एक भ्रष्ट साखळीची राजवट आहे.

कोकण आयुक्तांनी आता तरी कायद्याचा बडगा उचलावा!– असा संतप्त आणि ठाम इशारा सामाजिक कार्यकर्ता/पत्रकार रूबिना मुल्ला यांनी दिला.

## जुचंद्रमध्ये तहसीलदारांच्या आदेशाला केराची टोपली; तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांचा बेकायदेशीर कारभार उघड ?

वसई प्रतिनिधी-वसई तालुक्यातील जुचंद्र गावात शासकीय यंत्रणेच्या विश्वासाला तडा जाणारा गंभीर प्रकार समोर आला आहे. तहसीलदारांच्या स्पष्ट आदेशाविना तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी बेकायदेशीरपणे फेरफार करून, थेट कायद्याची पायमल्ली केली आहे. या प्रकरणामुळे स्थानिकांमध्ये तीव्र संताप पसरला असून, प्रशासनावर विश्वास उरलेला नाही, असे रोषाने सांगण्यात येत आहेतहसीलदारांनी नकार दिला, तरी फेरफार झाला!प्राप्त माहितीनुसार, जुचंद्र गावात काही व्यक्तींनी फेरफारासाठी प्रस्ताव दिला होता. मात्र सदर फेरफार तहसीलदारांनी तिनदा स्पष्टपणे नाकारला. त्यांनी कोणतेही लेखी आदेश दिले नसतानाही, तलाठी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी त्याला दुजोरा देत परस्पर फेरफाराची नोंद केलीहे केवळ अधिकारांचा गैरवापर नाही, तर थेट शासकीय सत्तेचा अवमान आहेमाहिती अधिकारात स्फोटक खुलासा

या संदर्भात ग्रामस्थांनी संबंधित विभागाकडे माहिती अधिकारात अर्ज केला असता, उत्तरात असे नमूद करण्यात आले की – सदर फेरफाराची कोणतीही अधिकृत साचवलेली नोंद ( संचिता ) उपलब्ध नाही.

यावरून स्पष्ट होते की हे संपूर्ण प्रकरण गुपचूप आणि अनधिकृतरीत्या रेटण्यात आले आहे. कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता फेरफार केल्याचे ही माहिती स्पष्ट करते.

खाजगी व्यक्तींना शासकीय कामात सामील करण्याचा प्रकार

या प्रकारावरच थांबत नाही – शासनाच्या स्पष्ट आदेशानुसार खाजगी व्यक्तींना शासकीय कामात सहभागी करण्यास बंदी असतानाही, जुचंद्र गावात २ ते ३ खाजगी व्यक्ती बिनधास्तपणे शासकीय कागदपत्रांवर काम करत असल्याचेही समोर आले आहे.

ही काय तहसील कार्यालय आहे की खासगी दलालांची बाजारपेठ?, असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत.

प्रशासन बधणार की पुन्हा डोळेझाक करणार?

तहसीलदारांनी जेव्हा स्पष्ट आदेश दिलेले नव्हते, तेव्हा या अधिकाऱ्यांनी कोणाच्या परवानगीने फेरफार केला? आणि खाजगी व्यक्तींना अधिकार नसताना त्यांनी शासकीय कामात सहभाग कसा घेतला?

या सर्व प्रकारांची चौकशी होऊन संबंधित तलाठी व मंडळ अधिवरूयांवर तात्काळ निलंबन व फौजदारी कारवाई व्हावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

हा भ्रष्टाचार नाही, तर थेट कायद्याचा खून आहे!

हा प्रकार केवळ भ्रष्टाचारापुरता मर्यादित नाही, तर थेट प्रशासनाच्या गळ्याला फास देणारा आहे.

जर कारवाई झाली नाही, तर जुचंद्र गावात तीव्र आंदोलन पेटेल, असा थेट इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

प्रशासन आता जागं होणार का, की पुन्हा जनतेच्या आवाजाला झापडं लावणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



## सीयूसी विभागाचे प्रमुख उपायुक्त दीपक सावंत यांचे अनधिकृत बांधकामांना दिलासा देण्याचे धोरण कायम

## वालीव प्रभागाचे सहआयुक्त निलेश म्हात्रे यांची कारकीर्द संशयास्पद 'जी हद्दीत अनधिकृत बांधकामे

सातीवलीतील साई रेसिडेन्सी हुंडाई शोरूम येथे गार्डन आरक्षित आणि गुरुचरण जागेवर आतापर्यंत ६० ते ७० अनधिकृत औद्योगिक गाळ्यांचे बांधकाम शहरातील विविध ठिकाणी आम जनतेला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मूलभूत गरजांची उणिवा असल्याकारणाने जनता महापालिका प्रशासनाच्या अपेक्षापार्थि असते

प्ररंतु याउलट आयुक्तांचा प्रशासकीय कारभार लागू असताना पुरेशी माहिती नसल्याने मात्र लोकांना पालिकेच्या विविध उपक्रमापासून वंचीत राहावे लागत आहेत्यामुळे लोकउपयोगी उपक्रम राबविण्यात आलेल्या पैकी काहीच उपक्रम आम जनतेला माहित असावेआयुक्त अनिल कुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशस्त कारभार चालू असतो पण ते

'अनधिकृत बांधकामय्या विषयाने नेहमी पळती वाट शोधतात. आयुक्तांच्या चूप राहण्याच्या परिणामी त्यांना ही प्रभाग हद्दीत होणाऱ्या अनधिकृत बांधकामांना फूस असल्याचं बोलले जात आहे त्यामुळे अपेक्षापार्थि जनतेत निराशाजनक वातावरण आहे.महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकाम होणे कोणती नवी गोष्ट नाही.आयुक्त

'अनधिकृत बांधकामर्यविषयापासून टाळा टाळ करताना दिसतात याचा गैरफायदा घेत कनिष्ठ अधिकारी अनधिकृत बांधकामे वाढविण्यात व्यस्थ झालेले आहेत मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार करून वसई विरार शहर अनधिकृत बांधकामांनी भकास होण्याच्या मार्गावर वाटचाल करत आहेतसेच गेल्या काही महिन्यातच प्रभाग जी हद्दीत किमान लाखो चौरस फूट अनधिकृत बांधकामे उभारली गेली आहेत. त्यामुळे संबंधित पालिका अधिकारी आणि बांधकाम व्यावसायिक यांच्यामध्ये आर्थिक हातमिळवणी झाली असल्याचं स्पष्ट होत आहे

क्रनिष्ठ अधिकाऱ्यांबद्दल वरिष्ठांना रीतसर तक्रारी देऊन सुद्धा जी च्या काही भ्रष्ट अधिकऱ्यांकडून काही अनधिकृत बांधकामे अधिकृत असल्याचे सांगणी करण्यात येत आहे. आणि काही अनधिकृत बांधकामे आपल्या हद्दीतच नाहीत असे सांगुण महसूल विभागाकडे बोट दाखवण्यात येतेशिवाय त्याचबरोबर कनिष्ठ अधिकारी vvmc फेक बोर्ड लावून अनधिकृत बांधकामे बेफिकर उभारण्याची कल्पना बांधकाम व्यावसायिकांना देत आहेतत्यामुळे अश्या धुरंदर भ्रष्टाचारी पालिका अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई होणे आवश्यक बनले आहेव्रालीव प्रभाग हद्दीतील सातीवलीतील साई रेसिडेन्सी हुंडाई शोरूम येथे गार्डन आरक्षित आणि गुरुचरण जागेवर आतापर्यंत ६० ते ७० अनधिकृत औद्योगिक गाळ्यांचे बांधकाम झाल्याचे सहआयुक्त निलेश म्हात्रे यांना निर्देशनास आणून दिल्यानंतर हे बांधकाम महसूल हद्दीत असल्याचे त्यांच्याकडून सांगितले गेले आहे. शिवाय सीयूसी विभागाकडून सम्पूर्ण प्रकरणाची काडीची दखल घेण्यात आलेली नाहीप्रण वरील भूखंडावर महापालिका प्रशासनाने गेल्या दोन वर्षात सुमारे आतापर्यंत पाच वेळा तोडक कारवाई केली गेली आहेप्रण सहआयुक्त निलेश म्हात्रे यांच्या कार्यकाळात वरील जागा महसूल विभागाला स्वाधीन कशी झाली याबाबत जनतेत प्रश्न आहे.वरिष्ठांना ठेंगा दाखवत सहआयुक्त निलेश म्हात्रे आणि उपायुक्त दीपक सावंत तोंडाला येईल ते बरळत चालले आहेतत्यामुळे आयुक्त अनिलकुमार पवार यांनी कनिष्ठ अधिकाऱ्यांची पुन्हा चौकशी करून कायदेशीर कारवाई करावी अशी जनमानसात मागणी होत आहे. राजकारण आणि कार्यकर्ते यांच्या दबावाखाली पालिका अधिकारी वावरत असल्याचे सांगण्यात येते आहे म्हणून नोकरी सांभाळून अनैतिक प्रकार करण्याची खबरदारी पालिका अधिकाऱ्यांनी बाळगावी असे जाणकारांचे मत आहे.

# जावेद नासिर खान यांची 'कामगार नेता' मध्ये उपसंपादक पदी नियुक्ती

वसई : पत्रकारितेची आवड आणि सामाजिक भान याची दखल घेत 'कामगार नेता' या हिंदी पाक्षिकाचे संपादक अमोल गायकवाड यांनी जावेद नासिर खान यांची उपसंपादकपदी नियुक्ती केली. वसई पूर्व येथील दत्तानी मॉलमध्ये यासंदर्भातील औपचारिक बैठक पार पडली. यावेळी युनिटी मीडिया प्रेस क्लबच्या अध्यक्षा रुबीना मुल्ला यांनी जावेद खान यांना नियुक्तीपत्र आणि ओळखपत्र प्रदान केले. त्यांना भावी वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देताना मुल्ला म्हणाल्या, पत्रकार समाजाचा आरसा असतो आणि आरसा नेहमी सत्य दाखवतो.सत्य परेशान हो सकता है मगर पराजित नहीं. निर्भीड आणि जबाबदार पत्रकारिता ही काळाची गरज आहे.'

त्यांनी पुढे सांगितले की, 'पत्रकार हा



लोकशाहीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. आपण संविधानाचे रक्षक आहोत. समाजात धर्म आणि जात या नावावर फूट पाडण्याचा प्रयत्न काहीजण करत आहेत. अशा परिस्थितीत पत्रकारांनी विशेष दक्षता घ्यावी आणि सामाजिक सलोखा राखण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी. 'जावेद नासिर खान यांना पत्रकार मंडळींनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या असून त्यांच्या कार्यकुशलतेवर विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

●●●





वसई (प्रतिनिधी) - सातिवली येथील मौर्यानाका परिसरात असलेल्या राजदीप इंडस्ट्रियल प्रिमाइझेसमध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम सुरू असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. या ठिकाणी पत्र्याचे शेड, पोटमाळा व इतर वाढीव बांधकाम चालू असून, संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करूनही कारवाई होत नसल्याचा आरोप आहे.

संबंधित प्रकरणात सहाय्यक आयुक्त निलेश म्हात्रे यांच्याकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. मात्र, हेच अधिकारी ७ एप्रिल रोजी डाईस बिल्डिंगच्या मागे असलेल्या बौद्ध समाजातील गरीब महिलांच्या टपाऱ्यांवर तातडीने कारवाई करताना दिसले होते. स्थानिक दलित समाजाचा आरोप आहे की, गरीबांवर कठोर कारवाई करणारे प्रशासन प्रस्थापित उद्योगपती व बिल्डरांवर मात्र सौम्य भूमिका घेत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार गट ) चे जिल्हा सरचिटणीस व सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष रोहित ससाणे यांनी प्रशासनाविरुद्ध आवाज उठवत स्पष्ट केले की, 'जर दलितांच्या टपाऱ्यांवर कारवाई केली जाते, तर श्रीमंत व बांधकाम व्यावसायिकांवरही तशीच कारवाई झालीच पाहिजे. अन्यथा आम्ही पीडित दलितांसह 'भीक मागो आंदोलन' करणार आहोत.'

या प्रकरणावर प्रशासनाकडून अधिकृत प्रतिक्रिया अद्याप आलेली नाही. मात्र, स्थानिक स्तरावर वाढत चाललेल्या असंतोषामुळे हे प्रकरण अधिकच तापण्याची शक्यता आहे.

# ईडीकडून मोठ्या मगरमच्छांवर हल्ला; वसई पालिकेत मात्र लहान माशांना 'सुवर्ण अभय'?




वसई - विशेष प्रतिनिधी-राज्यात आर्थिक गैरव्यवहारांवर ईडीकडून धडाकेबाज कारवाई होत असताना, वसईतील वालिव परिसरात मात्र लोकप्रतिनिधींच्या छत्रछायेखाली अनधिकृत बांधकामांना बिनधास्त अभय दिलं जात आहे. कायद्याची पायमल्ली करत बांधकाम सुरू असून, वसई-विरार महापालिकेच्या अधिकाऱ्यांचा संशयास्पद सहभाग यात उघड दिसतोय.

हे केवळ दुर्लक्ष नाही, तर सरळसरळ वसई विरार अधिकारांच्या आशीर्वादाने सुरू असलेला भ्रष्टाचाराचा खेळ असल्याचं स्थानिक नागरिकांचं खदखदीत मत आहे.

नोवा इस्टेटसमोर बांधकामाचा उघडपणे चाललेला 'मसुदा'!वालिवमधील नोवा इंडस्ट्रीयल इस्टेटसमोरील भूखंडावर परवानगीविना वाणिज्य गाळ्यांचं बांधकाम जोमात सुरू आहे. कोणतीही कायदेशीर परवानगी नसताना उभे राहत असलेले हे गाळे केवळ बांधकाम नियमांचा नाही, तर महापालिकेच्या नैतिकतेचा फज्जा उडवत आहेतग्रा अनधिकृत कामांबाबत नागरिकांनी तक्रारी देऊनही प्रशासनाने कानाडोळा केलाय – आणि हाच कानाडोळा भ्रष्टाचाराचा साक्षीदार ठरत आहेनिलेश म्हात्रे आणि दीपक सावंत – कारवाई न करणारे की संरक्षण करणारे?

सहआयुक्त निलेश म्हात्रे आणि उपायुक्त दीपक सावंत या दोन अधिकाऱ्यांची नावे सतत या प्रकरणात पुढे येत आहेत. बांधकाम थांबवण्याचे सर्व अधिकार असूनही दोघांनी दुर्लक्ष का केलं?

हा निष्क्रियपणा की मुद्दाम केलेला सक्रिय अभय'? महत्त्वाचं म्हणजे, एका बाजूला शहरात अधिकृत व्यवसायांना नियमांची पर्वा न करता नोटीस पाठवली जाते, आणि दुसरीकडे हे बांधकाम मात्र दिवसाढवळ्या सुरू आहे - याला काय म्हणायचं? धोरणशून्यता की पक्षपाती भ्रष्टाचार?ईडी मोठ्यांवर तुटून पडते, पण पालिकेचं लक्ष लहान मगरमच्छांकडून हटवलेलं?

राज्यात अनेक कोटींचे प्रकल्प तपासाच्या फेऱ्यात आहेत, परंतु वसईतील या छोट्या बांधकामांमागचा पैशाचा आणि सत्तेचा खेळ कुणीच उघड करत नाही.

'मोठ्यांवर कारवाई दाखवून लहानांवर 'डील' चालतेय का?' असा साफ सवाल लोकांच्या ओठांवर आहे.

या प्रकरणाने वसईतील स्थानिक प्रशासन आणि बिल्डर यांच्यातील 'गुप्त गाठ' उघडपणे समोर आणली आहे. महापालिकेच्या भ्रष्ट यंत्रणेला 'पूॅन पास'!

महापालिका प्रशासन हे सामान्य जनतेसाठी नियमांची कडक अंमलबजावणी करतं, पण बिल्डर लॉबीसमोर मात्र गुडघे टेकते.

हा 'डबल स्टँडड'' म्हणजे फक्त निष्क्रियता नव्हे, तर नैतिक दिवाळखोरीचं ठळक उदाहरण आहे'.कोणीही चौकशी करणार नाही, कारण चौकशी झाली तर साखळी तुटेल आणि अनेक 'वरचेवर' हात जळतील!' असं स्पष्ट म्हणणं स्थानिक नागरी कार्यकर्त्यांचं आहे.

### ठळक मुद्दे :

नोवा इस्टेटसमोरील अनधिकृत गाळ्यांना 'पालीकेकडून मौनाधिकार'?

सहआयुक्त म्हात्रे आणि उपायुक्त सावंत – कारवाईसाठी अपात्र की 'मिळालेल्या फायद्याचे पात्र'?

नागरिकांच्या तक्रारी झाकून पालिकेचा 'भोंगळ७ कारभार

कायदा सर्वांसाठी समान आहे का? की काहींना खास 'अनधिकृत सवलती'?

'बिल्डरपेक्षा अधिक दोषी अधिकारी!' – नागरिकांचा संतप्त सवाल

### स्फोटक सवाल :

'अनधिकृत७ बांधकामावर प्रशासन गप्प का?

कोणाचे वरदहस्त, कुणाचा आशीर्वाद या गाळ्यांच्या भिंतींमध्ये दडलेला आहे?

महापालिकेतील अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित होणार की प्रकरण 'मिटींगष्मध्येच संपणार?

# मुंबई-बडोदा प्रकल्पात कोट्यवधींचा घोटाळा!
## वसई प्रांत कार्यालयात 'बेनामी' व्यक्तीचा अड्डा; शेतकऱ्यांचा संताप उसळला

वसई प्रतिनिधी- मुंबई-बडोदा महामार्गासाठी वसई तालुक्यातील कशीदकोपार गावातील जमिनी जबरदस्तीने संपादित करण्यात आल्या, पण शेतकऱ्यांना आजतागायत मोबदला मिळालेला नाही. या साऱ्या प्रकारामागे कोट्यवधींचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप तेथील ग्रामस्थांनी केला आहेग्रा सगळ्या भ्रष्ट कारभारात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे एक गैरकायदेशीर, अनधिकृत व्यक्ती दररोज वसई प्रांत कार्यालयात मुक्तपणे वावरत असून, तोच या संपूर्ण घोटाळ्याचा सूत्रधार असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. ना तो सरकारी कर्मचारी, ना अधिकृत अधिकारी – तरीही फायली हाताळतो, निणऱ्य घेतो आणि व्यवहारांमध्ये थेट हस्तक्षेप करतो! शेतकऱ्यांच्या जिवाभावाच्या जमिनी हिरावून घेतल्या जातात, मोबदल्याच्या नावाखाली फसवणूक होते आणि त्यावर टाळं ठोकून प्रांत कार्यालयात एक भ्रष्टकिंग आरामात सिंहासन मांडतो – हा प्रकार लोकशाहीच्या गळाच घोटतोय, अशी संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

' ही काय प्रांत कार्यालय की खाजगी एजन्टांची बाजारपेठ?', असा थेट सवाल ग्रामस्थांनी केला आहे. प्रांत अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय अशा व्यक्तीचा कार्यालयात मुक्त प्रवेश कसा शक्य आहे, याचे उत्तर प्रशासनाने द्यावेच लागेल, अशी आक्रमक मागणी करण्यात येत आहे.

लवकरच या गैरकृत्याचा मुख्य सूत्रधार उघड होणार असून, त्याला तुरुंगात पाठवले जाईल, अशी जोरदार चर्चा सुरू आहे.

शेतकऱ्यांचे हाल, जमिनींची लूट आणि प्रशासनाचा नपुंसकपणा – या तिहेरी घावांमुळे कशीदकोपार गाव पेटू लागले आहे. सरकार आणि प्रशासन किती झोपेत आहे?

हा केवळ भ्रष्टाचार नाही, तर लोकशाहीवरचाच घातक आघात आहे!


## युवाशक्ती एक्सप्रेस कार्यालय- ९८९०८७९७५७

वृत्तपत्रात प्रसिद्ध होणारा मजकूर आलेल्या कागदपत्रांवर आधारित असतो. त्यामुळे प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत कोणाला आक्षेप असल्यास संबंधितांनी योग्य त्या कागदपत्रांसह **युवाशक्ती एक्सप्रेस** कार्यालयाशी संपर्क साधावा. सदर पुरावे योग्य असल्यास संबंधित बातमी बाबतचा खुलासा प्रसिद्ध केला जाईल. या पत्रात प्रसिद्ध होणा-या मजकुराला मुद्रक स्थळ जबाबदार राहणार नाही.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस मते प्रसिद्ध होणा-या कोणत्याही प्रकारच्या जाहिरातींबाबत कुठल्याही प्रकारचा वाद उद्भवल्यास त्याला युवाशक्ती एक्सप्रेस व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वृत्त प्रसिद्धी किंवा अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी संपादकाशी संपर्क साधायचा असल्यास संबंधितांनी दूरध्वनी कमांक ९८९०८७९७५७ वर संपर्क साधावा.

या नोटीसी द्वारे कळविण्यात येते कि साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या जाहिराती सर्व प्रकारच्या नोटीसी याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. संबंधित आणि संबंधित व्यक्तीशी परस्पर संबंध साधून त्याबाबत खात्री करावी. साप्ताहिक युवाशक्ती एक्सप्रेस वर्तमानपत्र व व्यवस्थापन याला कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

संपादक..


Printed,Published And Owned Tushar Rajratna Gaikwad,printed At Vava ArtsB/8 Dronagiri CHS.,Tanki Road Tulinj (E) Tal-Vasai 401209,Published From Room No.10 Kadarbhai Chawl Sarvoday Vasahat Tnki Road Nallasopara (E) Tal--Vasai Dist-Palghar-401209.Editor-tushar Rajratna Gaikwad
RNI NO.MAHMAR/2016/72543. Mobile-9960144348,9890879757,yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक म्हणून तुषार राजरत्न गायकवाड रु. नं. १०, कादरभाई चाळ, सर्वोदय वसाहत, आंबेडकर नगर, टाकीरोड, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९. ता. वसई, जि. पालघर, येथे प्रकाशित होऊन ९८९०८७९७५७ में. बाबा आर्टस् बी.०८, मथुरा नगर, द्रोणगिरी अपार्टमेंट, टाकी रोड, साई बाबा मंदिर जवळ, नालासोपारा (पुर्व), ४०१२०९ जि. पालघर, महाराष्ट्र येथे मुद्रित करणयात आले. मोबाईल नं. ९९६०१४४३४८
या अंकात प्रसिद्ध झालेलया बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेलया मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद वसई न्यायालयाच्या कक्षेत) Email:yuvashaktiexpress123@gmail.com www.yuvashaktiexpress.in